संत गाडगे महाराज यांचे तात्विक आणि शैक्षणिक विचार एक चिंतन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या

मानव विज्ञान विद्याशाखांतर्गत तत्वज्ञान

विषयातील पीएच.डी.पदवीच्या नियोजित

संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा

संशोधक विद्यार्थी

जगन्नाथ विठ्ठलराव कदम

एम.ए. (तत्वज्ञान) सेट

संशोधन मार्गदर्शक

डॉ. उपाडे जी.एम.

तत्वज्ञान विभागप्रमुख

बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी

जुलै २०२१

संत गाडगे महाराज यांचे तात्विक आणि शैक्षणिक विचार एक चिंतन

प्रस्तावना :-

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संत गाडगे महाराज यांचे तात्विक आणि शैक्षणिक विचार एक चिंतन हा विषय निवडला आहे. महाराष्ट्रात अनेक जाती,धर्माचे,पंथाचे संत होऊन गेले. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणुन ओळखली जाते. संतांनी मानवतेची आणि परोपकाराची शिकवण दिली. लोकोध्दाराचे महान मंदिर संतांनीच या महाराष्ट्रात उभारले. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. नामदेवांनी त्याच्या भिंती बांधल्या. एकनाथांनी त्यावर घुमट चढविला. तुकोबांनी कळस बांधला आणि गाडगेबाबांनी त्या कळसावर पताका फडकाविली.

जीवन व कार्य :-

संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्हयातील शेणगाव येथे झाला. गाडगेबाबा महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी अनेक गावांना भेटी दिल्या. गाडगेबाबांची सामाजिक न्याय,अंधश्रध्दा,स्वच्छता या विषयात जास्त रूची होती. विसाव्या शतकातील समाजसुधारक आंदोलनामध्ये ज्या महापुरूषांचा सहभाग आहे त्यापैकी एक महत्वाचे नाव संत गाडगेबाबा यांचे आहे.

संत गाडगे महाराजांचे पूर्ण नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी राणोजी जाणोरकर तर आईचे नाव सखुबाई झिंगराजी जाणोरकर हे होते. गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टीकोन असलेले प्रसिध्द समाजसुधारक होते. दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपलं पुर्ण आयुष्य व्यतीत करणारे गाडगेबाबा हे संतामधील सुधारक आणि सुधारकामधील संत होते. त्यांचे कीर्तन म्हणजे लोकप्रबोधनाचा एक भाग असे. आपल्या कीर्तनातुन समाजातील दांभिकपणा,रूढी,परंपरा यावर ते टिका करत समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण गाडगेबाबा देत. गाडगेबाबा म्हणजे चालती-बोलती पाठशाळा होती.

गाडगेबाबा हे गोरगरीब, दीनदलित, यांच्यमधील अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे समासुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी असे ते म्हणत. दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. “ देवळात जाऊ नका, मुर्तीपुजा करू नका, सावकाराचे कर्ज काढु नका, अज्ञानी राहु नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार, असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका” अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनि दिलेल्या देणग्यातील पैशातुन रंजल्या-गांजल्या, अनाथ, लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. हया देवातच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकडयाची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडु, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, भोळया समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा, दुर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या माध्यमाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडुन कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, असे ते आपल्या कीर्तनातुन सांगत. देव दगडात नसुण तो माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. “मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही” असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळया लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा (व-हाडी बोली) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा वापर वेळोवेळी केला. देवभोळया माणसांपासुन ते नास्तिकापर्यंत कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवुन ठेवत. आपले तत्वज्ञान पटवुन देत.”त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे” असे उदगार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते.

१८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारू व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता. गावात कोणाचे काही अडले-नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वत:हून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्वजनांनी एकवटुन केली पाहिजे हा धडा त्यांनी गावक-यांना शिकविला. दिनांक १ फब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून सन्यास स्विकारला. त्यांनी तिर्थाटन केले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला मदत करायला धावायचे. मदत करूण कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता निघुण जायचे. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना “गाडगेबाबा” म्हणु लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडुन स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रध्दा निर्मुलन, ही तत्वे समाजात रूजविण्यासाठी त्यांनी स्वत: सातत्याने सक्रिय राहुन जीवापाड प्रयत्न केले. त्यांनी नाशिक, देहु, आळंदी व पंढरपुर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोर-गरीब जनतेसाठी छोटी-मोठी रूग्णालये बांधली, अनेक नद्याकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, गनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्राची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली.

महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत “ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस” असे म्हणटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली असे म्हणटले जाते. “महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ" असे उदगार आचार्य अत्रे यांनी गाडगेबाबांबदल काढले आहेत.

संत गाडगेबाबांनी कीर्तनाद्वारे आपले लोकशिक्षणाचे कार्य ऋणमोचन (विदर्भ) या गावापासुन सुरू केले. ऋणमोचन येथे त्यांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधले. १९०८ मध्ये पूर्णा नदीवर घाट बांधुन घेतला. १९१७ पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाळा बांधली. १९२५ मुर्तिजापूर येथे गोरक्षण कार्य केले आणि धर्मशाळा व विद्यालय बांधले. १९३२ ऋणमोचन येथील सदावर्त संत गाडगेबाबांनी बांधले. ८ फेब्रुवारी १९५२ रोजी "श्री गाडगेबाबा मिशन" स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था व धर्मशाळा स्थापन केल्या.

संत गाडगेबाबांचा दशसुत्री संदेश / प्रबोधनकाव्य

भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघडयानागडयांना = वस्त्र, गरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध-पंगु-रोगी यांना= औषधोपचार, बेकारांना = रोजगार, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरूण-तरूणींचे = लग्न, दु:खी व निराशांना = हिंमत हाच आजचा रोकडा धर्म आहे, हीच खरी भक्ती व देवपुजा आहे असे ते म्हणत.

गाडगेबाबांनी कीर्तनाद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबिला. "गोपाला-गोपाला देवकीनंदन गोपाला" हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते. त्यांच्या जीवनावर "डेबु" व "देवकीनंदन गोपाला" हे चित्रपट निघाले असुन "गोपाला-गोपाला देवकीनंदन गोपाला" हे गीत मन्नाडे यांनी गायले आहे. आचार्य अत्रे गाडगेबाबा बद्यल म्हणतात, "सिंहाला पहावे वनात, हत्तीला पहावे रानात तर गाडगेबाबांना पहावे कीर्तनात".

१९३१ वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातुन पशुहत्या बंद झाली. १९५४ मध्ये गाडगेबाबांनी मुंबईत जे.जे. हॉस्पिटलच्या रोग्यांच्या नातेवाईकांना उतरण्यासाठी हॉस्पिटलजवळ धर्मशाळा बांधली. गाडगेबाबांनी डॉ. पंजाबराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील यांना त्यांच्या कार्यात मदत केली. डॉ. आंबेडकर त्यांना गुरूस्थानी मानत असत.

लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासात त्यांचे अमरावती जवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. "गोपाला-गोपाला देवकीनंदन गोपाला" या भजनाचा प्रसार करणा-या कर्मयोगावर दृढ श्रध्दा असणा-या सत्पुरूषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला गाडगेबाबांचे नाव देऊन "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" असे नामकरण करण्यात आलेले आहे.

समस्यासुत्रण :-

लोकसंख्येच्या दृष्टिने भारत हा जगातील दोन नंबरचा देश म्हणुन ओळखला जातो. लोकसंख्येच्या दृष्टिने येथे नागरी सुविधा त्याप्रमाणात उपलब्ध नाहीत. याठिकाणी नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वच्छताविषयक अनेक समस्या आहेत. मग तो घनकचरा, प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसाण असो, उघडयावरील शौचालयाची समस्या असो, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची समस्या असो, शिक्षण व बेरोजगारीचा प्रश्न असो अशा अनेक समस्या आवासुन उभ्या आहेत.माणुस साक्षर झाला म्हणजे शहाणा झाला असे

म्हणता येणार नाही. बरेच सुशिक्षीत आजही अंधश्रध्दा, व्यसनाधीनता, अस्वच्छता, पर्यावरणाविषयी उदासीनता त्यांच्यात पहायला मिळते. कायदे करून यासर्व समस्या सुटणार नाहीत. या सोडवायच्या असतील तर संत गाडगे महाराज या कृतिशील लोकशिक्षकाच्या विचारांची आवश्यकता वाटते. म्हणुन प्रस्तुत संशोधनासाठी संत गाडगे महाराजांचे तात्विक आणि शैक्षणिक विचार एक चिंतन हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत संशोधनात दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये संत गाडगे महाराज यांच्या चरित्रात्मक साहित्य व इतर साहित्याच्या माध्यमातुन त्यांचे तात्विक व शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने स्पष्टीकरणात्मक, विश्लेषणात्मक व व्यष्टि अध्ययन (Case Studay) पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

उद्दीष्टे :-

१) सामाजिक विकासात संत गाडगे महाराज यांच्या तात्विक विचारांचा आढावा घेणे.
२) राष्ट्रविकासात संत गाडगे महाराज यांचे शैक्षणिक विचार आणि कार्याचा आढावा घेणे.
३) संत गाडगे महाराज यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रूजवणे.
४) राष्ट्रविकासात कृतीशील संत गाडगे महाराज यांच्या विचारांचे महत्व स्पष्ट करणे.

गृहितके :-

१) गाडगे महाराज एक कृतीशील संत होते.
२) समाजातील अनिष्ठप्रथांना अध्यात्माच्या (कीर्तनाच्या) माध्यमातुन सोडविण्याचा प्रयत्न केला.
३) संत गाडगे महाराजांनी व्यक्तिच्या भौतिक आणि वैचारीक स्वच्छतेवर भर दिला.
४) शिक्षण हा सर्व विकासाचा पाया आहे हे त्यांनी प्रबोधनाच्या माध्यमातुन सिध्द केले.
५) संत गाडगे महाराजांनी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवला.

संशोधन विषयाचे महत्व :-

माणुस हा समाजशिल प्राणी असुन समाजात असणा-या अनेक घटनांचे निरीक्षण करूण त्यावर उपाय शोधण्यासाठी माणुस सतत धडपडत असतो. समाजात असणा-या अंधश्रध्दा, अस्वच्छता, व्यसनाधीनता यावर संत गाडगे महाराजांनी कडाडुन हल्ला चढवला. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातुन संत गाडगे महाराजांचे तात्विक आणि शैक्षणिक

विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मदत होईल. ग्रामीण भागातील जनतेला या संशोधनाचा उपयोग होईल. तसेच ग्रामीण व शहरी भागातील स्वच्छतेचे महत्व जनतेला समजण्यास महत्व होईल.

परंपरेच्या ठराविक चाकोरी बाहेरचे नव्या विचारांचे तत्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरवणे फार मोठे कठीण काम मोठ-मोठया धर्म-पंथ संस्थापकांना ही जमले नाही ते काम गाडगे महाराजांनी केले. कीर्तन परंपरेच्या माध्यमातुन समाजाला उपदेश करण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. त्यांनी सांगितलेली दशसुत्री आजही महत्वाची आहे.

संशोधन व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात संत गाडगे महाराजांचे अनेक क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी समाजात असलेल्या अनेक वाईट चालीरीती, रूढी-परंपरा, यांना छेद देउन स्वच्छतेचा संदेश देत वैज्ञानीक दृष्टिकोन रूजवण्यासाठी कीर्तनाच्या माध्यमातुन आयुष्यभर समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संत गाडगे महाराज यांच्या तात्विक आणि शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरणांची रूपरेषा :-

प्रकरण १ :- जीवन व कार्य

या प्रकरणामध्ये गाडगे महाराजांचा जन्म, शिक्षण, विवाह, सन्यास घेवुन समाजकार्याला केलेली सुरूवात व देहावसान या सर्व गोष्टींवा आढावा घेणार आहे.

प्रकरण २ :- जीवनविषयक तत्वज्ञान

संत तुकाराम महाराजांना ते आपले गुरू मानत. त्यांच्या अभंगांचा आधार घेवुन कीर्तनाच्या माध्यमातुन गावोगावी जावुन केलेले समाजप्रबोधन तसेच त्यांनी स्थापन केलेल्या संस्था, धर्मशाळा, विद्यालये,त्यांनी सांगितलेला दशसुत्री कार्यक्रम या बाबींचा विचार या प्रकरणात होणार आहे.

प्रकरण ३ :- तात्विक विचार

प्रस्तुत प्रकरणात संत गाडगे महाराज यांच्या तात्विक विचारांचा आढावा घेणार आहे त्याच बरोबर इतर संतांच्या विचार प्रभावांचे विवेचन होणार आहे.

प्रकरण ४ :- शैक्षणिक विचार

देवभोळेपणा सोडुन समाजाला डोळस दृष्टी देणारे सर्वच विचार तसेच त्यांनी लोकोध्दारासाठी केलेल्या कृती कार्यक्रमाचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण ५ :- निष्कर्ष / समारोप

संदर्भ ग्रंथ :-

१) भगत, रा.तु. ; लोकसंत गाडगे महाराज ,सिध्दराज प्रकाशन,कागज पुणे.
२) ठाकरे के.सी.; संत गाडगेबाबा प्रबुध्द भारत पुस्तकालय, औरंगाबाद.
३) भोसले,द.ता. ; लोकोत्तर गाडगेबाबा जिवन आणि कार्य, ग्रंथाली प्रकाशन,मुंबई.
४) दांडेकरगो.नी.; श्री गाडगेबाबांचे शेवटचे कीर्तन ,मृण्मयी प्रकाशन,पुणे.
५) केचे मधुकर. ; श्रीसंत गाडगे महाराज ,साकेत प्रकाशन प्रा.लि. औरंगाबाद.
६) भगत, रा.तु. ; स्वच्छतासंत गाडगेबाबा ,चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर.
७) दांडेकर गोपाल नीलकण्ठ.; देवकीनंदन गोपाला श्रीसंत गाडगेबाबा, मृण्मयी प्रकाशन,पुणे.
८) कीर गिरिजा.; मानवतावादी युगपुरूष संत गाडगेबाबा ,पदिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे.
९) WWW.google.com

संशोधक मार्गदर्शक
डॉ.उपाडे जी.एम.
तत्वज्ञान विभागप्रमुख
बी.रघुनाथ महाविद्यालय,परभणी

संशोधक विद्यार्थी
जगन्नाथ विठ्ठलराव कदम
एम.ए.(तत्वज्ञान)सेट